# प्रकाशमार्ग

Volume 5 Issue 5 FEBRUARY 2013 Rs. 25


## प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे
(मागील अंकांमधून घेतलेले वेचे)

माझे जीवन महर्षी अमरांनी व्यापलेले आहे. १९७७ साली त्यांना भेटल्यानंतरच मी खरंतर जगायला सुरुवात केली. मी पुष्कळ गोष्टींचा त्याग केला, पुष्कळ लोकांची संगत सोडली पण अमरांना मी कधीच सोडले नाही. किंवा खरंतर मी म्हणायला हवे की अमरांनी मला सोडले नाही, अगदी त्यांच्या मृत्युनंतर देखील. मृत्यु म्हणजे तर फक्त शरीराचा त्याग करणेच असते. जेव्हा कधीही मी अडचणीत किंवा द्विधा मनःस्थितीत होतो, तेव्हा तेव्हा अमरांनी मला मार्गदर्शन दिले. त्यांनी अशा गोष्टी मला शिकवल्या ज्या पुस्तकांमध्ये सापडत नाहीत. माझ्या जीवनाला त्यांनी एक दिशा आणि ध्येय दिले. हजारो वर्षांच्या प्रयत्नांनी सुद्धा जिथे मी पोहोचू शकलो नसतो अशा उच्च जगांमध्ये त्यांनी मला नेले. त्यांनी मागे ठेवलेल्या कार्यासाठी मी माझे हे आयुष्य व पुढील सर्व आयुष्ये जरी वेचली तरी माझे त्यांच्याप्रती असलेले प्रेम व माझ्या मनात त्यांच्याबद्दल असलेली कृतज्ञता पूर्णपणे व्यक्त होणार नाही.

ऋषींनी एकदा महर्षी अमरांना दिवसभर एका स्टूलावर बसण्यास सांगितले. ते बसले. त्यांच्या अवतीभवती असलेल्या लोकांनी त्यांची चेष्टा केली, त्यांच्यावर हसले. अमरांनी स्मित केले पण एक पूर्ण दिवसभर तस्से बसून राहिले. ते धोतर व झब्बा घालत असत व त्यांनी मिशी राखली होती. ऋषींनी त्यांना ही वेषभूषा बदलण्यास सांगितले. त्यांनी मिशी काढून टाकली आणि आधुनिक कपडे घालायला सुरुवात केली. का, असे त्यांनी ऋषींना कधीच विचारले नाही. त्यांनी कधीच ऋषींना उलटा प्रश्न केला नाही. ते फक्त ऋषींच्या आज्ञेचे पालन करत असत. मला आठवतं, ते आम्हाला समजावून सांगत असत की आपण आपल्या गुरुंच्या हातात एक साधन म्हणून राहायला हवे. ते म्हणत असत, "आपण जर एवढे करू शकलो नाही तर आपण परमेश्वराला शरण कसे जाणार?"

या गोष्टी आठवताना मला ह्याचा अचंबा वाटतो की, माझ्या अवतीभवती असलेले साधक एखाद्या परिस्थितीत, ऋषींनी दाखवलेल्या मार्गापेक्षा, त्यांचे व्यवहार ज्ञान त्यांना वेगळा मार्ग घेण्यास कसे बाध्य करत आहे, हे मला पटवून देण्याचा प्रयत्न करतात. लोक पुस्तकांत लिहिलेले विचार बोलून दाखवतात आणि विशेषकरून परदेशी लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांतील विचार ते बोलून दाखवतात, मला हे समजावताना ऐकून सुद्धा, की आपल्याला मिळालेले ज्ञान ऋषींनी स्वतः अद्ययावत केले आहे आणि योगाची पाठ्यपुस्तके पुन्हा लिहिण्याची वेळ आता आली आहे.

कदाचित हे ज्ञान पसरण्यासाठी व लोकांना समजण्यासाठी मी आणखी थोडा काळ वाट पाहायला हवी. परदेशांचा दौरा करून, पुस्तके छापताना खूप गवगवा करून मला कदाचित खूप नाव कमवावे लागेल. खरंच मी या गोष्टींची पर्वा करायला हवी का? महर्षी अमरांनी तर या गोष्टींची कधीच पर्वा केली नाही! ते म्हणत असत – "कार्यासाठी तुम्ही खूप महत्त्वपूर्ण किंवा आवश्यक आहात असे समजू नका. तुम्हाला ही संधी देण्यात आलेली आहे. तुम्ही जर पुढे आला नाहीत तर इतर लोक पुढे येतील.... नुकसान तुमचे होईल, ऋषींचे नाही." ■


**मानसा फाउंडेशन (रजि.)**

तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

**तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो**

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

**बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात**

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

**आनेकल येथे**

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/-**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



तपोवनात जेथे गुरुजींचा दाहसंस्कार करण्यात आला होता, त्या ठिकाणी उभारलेले पिरॅमिड

## काही ठळक घडामोडी

- ३-२-२०१३ रोजी तपोनगर येथे होणाऱ्या महर्षी अमर जयंती समारंभात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी कृपया ३०-१-२०१३ पूर्वी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.
- ३-२-२०१३ रोजी तपोनगर येथे होणाऱ्या महर्षी अमर जयंती समारंभाच्या प्रसंगी "Quotes from the Rishis - Vol. 2" हे पुस्तक आणि गुरुजींच्या सोबत झालेल्या अनौपचारिक बैठकींचे व्हीडियो रेकॉर्डिंग असलेली डी.व्ही.डी. प्रकाशित करण्यात येईल.
- डेस्क कॅलेंडर्स उपलब्ध आहेत. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क करावा.
- तपोवनात गुरुजींची अंत्यक्रिया करण्यात आलेल्या जागी बांधलेल्या पिरॅमिडच्या आकाराच्या वास्तूला २५ डिसेंबरला ऊर्जित करण्यात आले. ७०० पेक्षा अधिक लोक तपोवनातील पार्किंग मध्ये जमले होते आणि १२ मिनिटे प्रकाश प्रवाहित करून त्यांनी ह्या वास्तूस ऊर्जित करण्याच्या कार्यक्रमात भाग घेतला.
- गुरुजींच्या व्याख्यानातील महत्त्वपूर्ण भाग आणि त्यांचे काही दुर्लभ फोटो असलेल्या जीवनचरित्राची डी. व्ही. डी. या प्रसंगी प्रकाशित करण्यात आली. या डी.व्ही.डी.ची कॉपी हवी असल्यास कृपया आम्हास तसे लिहून कळवावे.

**रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई-मेल द्वारा संपर्क साधावा.**

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०१ | शुक्रवार | महर्षी अमर जयंती |
| ०३ | रविवार | महर्षी अमर जयंती समारंभ / कृष्णाष्टमी |
| ०८ | शुक्रवार | शिवरात्री |
| १० | रविवार | अमावास्या |
| १७ | रविवार | रथसप्तमी |
| १८ | सोमवार | शुक्लाष्टमी |
| २० | बुधवार | शुक्ल दशमी |
| २५ | सोमवार | पौर्णिमा |

## महर्षी अमर जयंती कार्यक्रम तपोनगर येथे रविवार, ३-२-२०१३ रोजी

| | |
|---|---|
| ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | पुस्तक व डी.व्ही.डीचे प्रकाशन |
| | विशेष ध्यान |
| १२.३० वाजता | प्रसाद |

ध्यानसाधकांना रविवारच्या ध्यानवर्गाची डी.व्ही.डी पाठवणे आम्ही बंद करत आहोत. सध्या दर रविवारी ध्यानवर्गात आपण गुरुजींनी दिलेली आधीची व्याख्याने ऐकत आहोत. काही व्याख्यानांची पुनरावृत्ती होत असली तरी विद्यार्थ्यांना जर डी.व्ही.डीज् हव्या असतील, तर त्यांनी ३० जानेवारी, २०१३ च्या आत आम्हास तसे लिहून कळवावे. जर डी.व्ही.डीज् ची वर्गणी चालू ठेवण्याची इच्छा असलेल्या ध्यानसाधकांची संख्या मोठी असेल तर आम्ही डी.व्ही.डीज् पाठवणे चालू ठेवू.



गुरुजी या ठिकाणी यापेक्षाही लहान झोपडीत राहत होते
आणि इथेच त्यांनी ०१.०२.१९८८ या दिवशी मानसा फाऊंडेशनची स्थापना केली

## मानसा फाऊंडेशनची २५सावी वर्षगाठ

१ फेब्रुवारी, २०१३ या दिवशी मानसा फाऊंडेशनला, या सप्तर्षी मार्गाला २५ वर्षे पूर्ण होतील. महान प्रकाश गुरुंच्या मार्गदर्शनाप्रमाणे, १९८८ साली याच दिवशी गुरुजींनी एका झोपडीत, जिथे ते राहत होते, ध्यान करून मानसा फाऊंडेशनची स्थापना केली.

इतकी वर्षे गुरुजींनी, सत्य आणि दैवी प्रेमाच्या पवित्र मूल्यांनी या पवित्र मार्गाचे संगोपन केले. त्यांच्या पवित्रतेने कित्येक कठीण वादळांना पेलले. त्यांच्या चिकाटीने त्यांनी ह्या मार्गाचे व्यापारीकरण होऊ दिले नाही आणि ह्या मार्गाला नफ्याच्या हावीपासून दूर पवित्र ठेवले. ऋषींप्रती त्यांचे समर्पण नेहमीच परिपूर्ण होते आणि ऋषींच्या आदेशानुसार व तत्त्वांप्रमाणे जगत त्यांचे थोरपण वाढत गेले. अमर ऋषींप्रती आपल्या अढळ निष्ठेने त्यांनी वरील सर्वोच्च जगांमधून, दुर्मिळ आध्यात्मिक ऊर्जा आणि ज्ञान संपादन करून हा मार्ग बळकट केला आणि मानसा फाऊंडेशनच्या मार्फत, या जगाच्या पाठीवर कोठेही राहणाऱ्या कोणत्याही साधकासाठी त्यांनी आध्यात्मिक शिकवण आणि ध्यानाची तंत्रे उपलब्ध करून दिली.

आध्यात्मिक मार्गातील प्रत्येक साधक जेवढी प्रगती करतो, तेवढाच तो मार्ग प्रगती करत असतो. हा मानसाच्या मूलभूत तत्त्वांपैकी एक तत्त्व आहे. मानसाचे वैशिष्ट्य म्हणजे साधकांच्या आध्यात्मिक प्रगतीचा दर्जा आहे, त्यांची संख्या नव्हे. हा मार्ग प्रत्येक साधकाला आतापर्यंत वैयक्तिक मार्गदर्शन करत आला आहे आणि यापुढेही नेहमीच करत राहील.

या अद्वितीय आध्यात्मिक मार्गाची पहिली पंचवीस गौरवशाली वर्षे पायाभरणीची होती. गुरुजींनी हा मार्ग हजारो वर्षे टिकण्यासाठी स्थापित केला आहे. मानवता त्याची सर्वोच्च क्षमता गाठेपर्यंत, त्याला मार्गदर्शन करण्यासाठी, आपल्या ध्यानमंदिरांमध्ये प्रचंड प्रमाणात अव्यक्त आध्यात्मिक ऊर्जा आणि ज्ञान साठवलेले आहे.

गुरुजी व महान ऋषी, मानसा फाऊंडेशनच्या मार्फत साधकांना मार्गदर्शन करत राहतील. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८-०५-२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

०५–०१–२००३

नवीन वर्षाच्या पहिल्या वर्गाची सुरुवात करताना आपण निर्धार करूया की हे जीवन समग्रतेने जगण्यासाठी आपण कळकळीचे प्रयत्न करू. तोच परमार्थनिष्ठेचा हेतु आहे. ह्याच कारणासाठी आपण देवापासून लांब निघून येऊन या पृथ्वीवर जन्म घेतला. इथले जीवन आपल्याला अत्यंत शांतीपूर्ण आयुष्य जगण्यासाठी व उच्च वास्तवांचे भान येण्यासाठी अनेक अवसर देते.

उच्च वास्तवे जाणावी या दृष्टीने आपण सहसा विचार करत नाही. आपल्याला वाटते की आपल्या भोवतीचे जग हे एकमेव जग आहे. परंतु, आपल्या जगाव्यतिरिक्त इतरही जगे आहेत. ती चैतन्याच्या निरनिराळ्या उच्च स्तरांवर आहेत. स्वतः ईश्वर सर्वोच्च सत्य आहे. आपल्याला याचे भान आले पाहिजे. आपल्याला जर ही जाणीव झाली नाही तर आपण सुद्धा इतर कोणत्याही पशूसारखे किंवा वृक्षासारखे जिणे जगू. आपल्यात खूप काही प्रकट करण्याची आणि अनुभवण्याची क्षमता आहे.

मिळालेल्या संधींचा जर आपण उपयोग केला नाही तर आपला विकास होणार नाही आणि आपण समग्रतेने जगू शकणार नाही. आपण दुःखी होऊ कारण आपण योग्य निवड करणार नाही. आपण चुकीच्या गोष्टींच्या मागे लागू. फक्त भौतिक विषयांच्या कच्छपी लागू आणि अशा तऱ्हेने सर्व प्रकारच्या बंधनांत व पाशांमध्ये जखडले जाऊ. बंधनात असते वेळी शांती नावालाही नसते. तेव्हा बंधनातून पूर्ण मुक्ती मिळविण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील आणि मुक्ती जाणिवेतून मिळत असते.

अशा तऱ्हेचे पूर्ण प्रकाशित, अत्यंत आनंदी आणि शांतीमय जीवन जगणे सर्वथा शक्य आहे आणि त्याचा श्रीमंती व गरिबीशी मुळीच संबंध नाही. शांती ही मनाची अवस्था आहे. शांती आपल्या अस्तित्वाची सुद्धा अवस्था आहे. ह्या नूतन वर्षात अशी अवस्था प्राप्त करण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करूया.

आपण आपल्या ध्यानाची प्रत वाढवायला पाहिजे. ध्यानातून निर्माण होणाऱ्या लहरी संपूर्ण जगात पसरवल्या पाहिजेत. आपल्याला ते जमत नाही कारण आपल्या आत सुरू असलेले अंतर्विरोध आपण नीट हाताळू शकत नाही. आपले प्रयत्न एकवटत नाहीत. आपण सर्वांनी एकजूट केली तर ह्या संपूर्ण देशाची नियती बदलू शकतो. नवयुगासाठी अनेक व्यक्ती काम करीत आहेत. खेदाची बाब ही आहे की प्रत्येकजण त्याच्या स्वतःच्या पद्धतीने काम करू पाहतो. मी कायम अमरांना उद्धृत करतो. ते तर माझ्या रक्तातच आहेत. ते म्हणत, "अहंकार बाजूला ठेवण्यात येतो तेव्हाच कोणतेही कार्य सिद्धीस जाते." आपण एक होण्याचा प्रयत्न करूया आणि एकजूटीसाठी काम करूया. आपण हे एकोप्याचे जाळे तयार करू शकलो तर मानवजात पुढे जाईल. २००३ हे अप्रतिम सुंदर वर्ष होईल.

कोणीतरी मेणबत्तीची वात पेटवावी लागते. तो त्याग वाया जात नाही कारण तो मनुष्य स्वभाव आहे. पुढच्या पिढीला कोणत्याही तऱ्हेचे संघर्ष पाहावे लागणार नाहीत आणि कोणीच गरीब उरणार नाही. जर पूर्वसूरींनी हे केले नसते तर ही संस्कृती वाढली नसती. आपल्याला प्रशस्तीपत्रांचा विचार करायची गरज नाही. आपण मेणबत्त्या पेटवूया, आशा तेवत ठेवूया.

१२–०१–२००३

समर्पण म्हणजे देवाच्या संपर्कात राहणे; अंतःप्रेरणेद्वारा मिळणाऱ्या त्याच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक कृती करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक परिणाम देवाची देणगी मानून स्वीकारणे. याला म्हणतात संपूर्ण समर्पण. मग आपण प्रश्नचिन्ह उभे करणार नाही, कुरकूर करणार नाही किंवा तक्रार करणार नाही. कधीकधी, परिणाम फारसे आनंददायी नसले तरी आपण त्यांचा स्वीकार करतो. हे एका पातळीवर घडते. दुसरीही एक पातळी आहे. आपण अतिशय उच्च पातळीवरून भूतलावर आलो आहोत आणि येता येता आपण बुद्धी आणि मन घेऊन आलो. आपल्याला जर परत जायचे असेल आणि आपल्या घरी किंवा देवाकडे पोचायचे असेल तर आपल्याला या दोन वस्तू परत द्याव्या लागतील. अंततः आपल्याला ज्यामध्ये आपण आत्मा म्हणून राहतो ते आपले आध्यात्मिक शरीर सुद्धा परत करावे लागेल. हे संपूर्ण समर्पण होय.

आपण ध्यान करतो तेव्हा आपले मन व बुद्धी शांत होतात आणि आपण आपल्या जाणिवेला मनबुद्धीच्या पातळीच्या वर नेतो. हे एक प्रकारचे समर्पण आहे. समर्पणामध्ये आपली जाणीव विस्तारून देवापर्यंत पोहोचते आणि आपण त्याच्यात मिळून जातो. संपूर्ण समर्पण हा योग आहे कारण, देवामध्ये माझे मिळून जाणे, माझा व्यक्तिगत आत्मा आणि तो सर्वात्मा यांचे मीलन म्हणजेच योग.

आपल्या वैयक्तिक व पारमार्थिक प्रवासासाठी आणि ह्या पृथ्वीच्या नवीन चैतन्यामधील प्रवेशासाठी प्रेमाचे प्रकटीकरण फार महत्त्वाचे आहे. जोपर्यंत आपल्या आत हिंसा आहे आणि आपल्या भोवताली प्रेमाचा अभाव आहे तोपर्यंत आपण नव्या चेतनेत प्रवेश करू शकत नाही. आपल्या मधून नकारात्मक भावना व विचार काढून टाकण्यासाठी आपण आपल्या संपूर्ण शरीर प्रणालीची नीट जुळणी केली पाहिजे.

आपले शरीर, मन व बुद्धी यांचे एकीकरण करून आपल्यातील नकारात्मकतांना हाकलून देण्यासाठी पुलस्त्य महर्षींनी आपल्याला शंबला तत्त्व दिले आहे. ध्यानामध्ये ही त्रिपुटी घडून येते. म्हणून आपण अधिक ध्यान करूया. आपण ध्यान करतो तेव्हा आपोआपच ऊर्जांनी आपल्यात प्रवेश करून आपल्यातून प्रवाहित होण्यासाठी त्यांचे वाहक बनतो.

आपण सूक्ष्म जीव व उच्च जगांशी दुवा साधून त्यांचा अनुभव घेतला पाहिजे कारण, ते आपल्या जीवनाचा भाग आहेत. स्थूल जगात घडणाऱ्या घटना सूक्ष्म जगात ७२ तास आधी घडून गेलेल्या असतात. आपल्याला ७२ तास आधी समजले तर आपण आपले चुकीचे निर्णय बदलून सुज्ञपणे योग्य निर्णय घेऊ शकतो. आपण जर सूक्ष्म जगात प्रवास केला तर आपण केवळ ७२ तासच काय, पण कदाचित ७२ वर्षांपूर्वीच्या गोष्टी सुद्धा जाणू शकू. लोकांनी अशा रीतीने काळात प्रवास केला आहे. आपण सूक्ष्म जगात प्रवेश करू शकलो तर आपण विद्यमान आयुष्य कितीतरी जास्त शांतीने जगू शकू. सूक्ष्म जगाचे ज्ञान याकरिता महत्त्वाचे आहे. ऋषींबरोबर संपर्क साधणे खूप महत्त्वाचे आहे. ते सर्वात सुज्ञ व सामर्थ्यशाली आहेत. ते आपल्या आयुष्याला मार्ग दाखवतात.

२६–०१–२००३

आपल्या पृथ्वीवर पुष्कळ आध्यात्मिक ज्ञान उपलब्ध आहे. ते मिळवायला हजारो वर्षे लागली. हे ज्ञान महान ऋषींनी इथे आणले. ऋषींनी ते प्रत्यक्ष चैतन्याच्या उच्च स्तरांवरून म्हणजेच ईश्वराकडून ऊर्जांच्या रूपात मिळविले. त्यांनी त्या ऊर्जांचे रूपांतर विचारांमध्ये केले व लोकांपर्यंत पोचवले. तेव्हा आमच्याकडे तेवढी क्षमता असल्यामुळे आम्ही

# गुरुजी उवाच

(संकलन : शोभा राव ; अनुवाद : पूर्णिमा परुळेकर)

ईश्वराचा व सर्वोच्च सत्याचा अनुभव घेऊ शकलो. हे ज्ञान कालानुगते एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे पोचविले गेले. स्वाभाविकपणेच ते विपर्यस्त झाले. अमर म्हणाले की कलियुगात माणसे शरीराने, मनाने व बुद्धीने खुजी होतील. आपल्या कितीतरी शक्ती, उच्च क्षमता अस्त पावल्या. आपण ह्या ज्ञानाचे आकलन करू शकलो नाही, ज्ञान मिळवू शकलो नाही व बरेचसे ज्ञान नष्ट झाले. माणसे उच्च सत्याला धरून ठेवू शकली नाहीत. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या कल्पना लढवल्या आणि स्वतःची भर घालून आपल्याला समजावून सांगितले. या सर्वांमुळे एक प्रकारे रूढी प्रचलित झाल्या.

रूढी, संस्कार व अनेक नवनवीन मतप्रवाह आणि श्रद्धा यांच्या विद्यमाने केलेल्या आध्यात्मिक प्रवासाने आपल्याला गोंधळात टाकले आणि अशा तऱ्हेने आपले इतके नुकसान झाले. मूळच्या शुद्ध ज्ञानामध्ये पुष्कळ असंबद्ध ज्ञान मिसळले गेले. कोणाला आध्यात्मिक प्रवास करायचा झाल्यास त्याला पुष्कळशा असंबद्ध ज्ञानातून वाट काढावी लागे व त्यामुळे मूळ शुद्ध ज्ञान हरवून गेले.

हा गोंधळ दूर करण्याची व ज्ञानप्राप्तीसाठी तयार होत असलेल्या लोकांना मार्ग दाखवण्याची वेळ आता आली आहे. जगभर लोक जागृत होत आहेत. आपण नवयुगात प्रवेश करत आहोत. ही पृथ्वी अप्रतिम नवऊर्जांनी ओसंडून वाहते आहे. या ऊर्जा आपल्याला जागृत करीत आहेत. त्या काही कर्मे नष्ट करतात व मेंदूतील नवीन पेशींना उमलवतात. एकाएकी आपल्याला काय योग्य ते समजू लागते आणि आपण स्वतःच आपल्या अंतःप्रेरणेच्या योगे ते जाणू शकतो. हे ज्ञान प्राप्त करण्यासाठी लोकांची मानसिक तयारी होते आहे. विकास करून उच्च जगतांशी संपर्क साधण्यासाठी लोक खुले होत आहेत.

अशा वेळी ऋषींचे कार्य अतिशय महत्त्वाचे व अनमोल ठरते कारण आपण सत्ययुगात चाललो आहोत. विविध तंत्रांचा अभ्यास करून आपण सत्ययुगाविषयी जागृत होऊ शकतो आणि ईश्वराला अनुभवू शकतो. मला इथे अजून एक सांगायचे आहे की ह्या मार्गात कोणतीही गोष्ट लादली जात नाही. माझ्या गुरुंकडून जे मी ऐकतो ते मी सत्य म्हणून तुमच्या समोर ठेवतो. मी नेहमी म्हणतो, "तुमच्या अंतःप्रेरणेच्या सल्ल्यानुसार वागा." तुम्ही निवड केली, तुम्ही स्वीकार केला तर तुम्ही उच्च वास्तवांचा अनुभव घ्याल. त्यानंतर आपल्यातील प्रत्येकजण प्रकाशाचा वाहक बनेल. प्रत्येकजण प्रकाश बनेल व आपण इतरांपर्यंत प्रकाश पसरवू शकू. आपल्याला ध्यानाची केंद्रे उघडण्याची किंवा तत्सम काही करण्याची आवश्यकता नाही. आपण केवळ आपल्या पद्धतीने आयुष्य जगायचे, फक्त शुद्ध जीवन जगायचे. एवढे करण्याने आपण सत्ययुगाला स्पंदित करू आणि तेवढे पुरेसे आहे. ज्यांच्यामध्ये पुष्कळ ज्ञान भरलेले आहे अशा ह्या उर्जांचे आपण वाहक बनू. अशा रीतीने प्रत्येक ध्यानसाधक नकळत प्रकाश कार्यकर्ता बनेल.

०२-०२-२००३

इथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाचे मी आभार मानतो कारण, माझ्या गुरुंच्या जन्मदिनी तुमच्याबरोबर काही आठवणी वाटून घ्यायला मला फार आनंद होतो. आपण थोर सद्गुरुंची कृपा व ऊर्जा वाटून घेणार आहोत. आम्ही अमरांबद्दल जे बोलू ती अतिशयोक्ती वाटण्याची शक्यता आहे. परंतु, माझ्या शब्दावर विश्वास ठेवा की त्यांच्या योग्यतेच्या तुलनेत आम्ही त्यांच्याबद्दल जे सांगतो ते वस्तुतः काहीच नाही.

आपण सध्या प्रलयाच्या अत्यंत आव्हानात्मक काळात आहोत. अमर व त्यांच्या कार्याला समजून घेणे वाटते तितके सोपे नाही. आपल्याला कदाचित त्याचा थोडाफार आभास झाला असू शकतो पण त्यांच्या कार्याचा आवाका व विस्तार आपल्या कल्पनेबाहेर आहे. इथे प्रेमाचे नगर उभारावे हे त्यांचे स्वप्न होते. आपण जेव्हा खोल ध्यानात प्रकाशाचा अनुभव घेतो तेव्हाच केवळ आपण त्यांचे प्रेम जाणू शकतो. ह्या महान योजनेचा हिस्सा असणाऱ्या प्रत्येकाने त्यांचे प्रेम अनुभवले पाहिजे. तेव्हा आणि फक्त तेव्हाच आपण अमरांसाठी कार्य करण्याचा विचार करू शकतो व त्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी त्यांच्या योजनेत सहभागी होऊ शकतो.

अमरांनी आपल्याला खूप ज्ञान दिले. त्यापैकी काही तर अतिशय दुर्मिळ आहे. त्यांनी आपल्याला ध्यान सुद्धा शिकवले जे असंख्य प्रवेशद्वारे उघडून देणाऱ्या चावीप्रमाणे आहे. त्यांनी आपल्याला सांगितले की आपले इथले आयुष्य हे आपले एकमेव आयुष्य नाही. परंतु, आपण सूक्ष्म जगात सुद्धा वास करतो, त्याहून तरल अशा कारण जगात सुद्धा वास करतो व एकसमयावच्छेदेकरून ह्या सर्व स्तरांवर आपण वास करतो. अमरांनी आपली ऋषींशी ओळख करून दिली. ही त्यांनी आपल्याला केलेली सर्वात महान व सर्वात महत्त्वाची मदत आहे. त्यांनी अत्यंत निःसंदिग्धपणे खात्री दिली की ऋषी एका निराळ्या लोकात राहतात. तेथून ते नेहमी ह्या पृथ्वीवरील आपल्या जीवनावर लक्ष ठेवीत असतात. आपल्याला ह्या गोष्टी कधीच माहीत नव्हत्या. आपल्याला कधी माहीतच नव्हते की ऋषी आपल्याला आध्यात्मिक मार्गदर्शन देण्यासाठी प्रतीक्षेत आहेत आणि खडतर प्रयत्नांनी व प्रेमाच्या साहाय्याने कोणीही ऋषींशी संपर्क साधू शकतो. आता तर ऋषी आपल्या आयुष्याचा हिस्सा बनले आहेत.

अमरांनी नेटकेपणाने आपल्याला सृष्टी, आत्म्याचे अवतरण व तिरोहण याविषयी ज्ञान दिले. ते आम्ही 'आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण' या पुस्तकामध्ये प्रसिद्ध केले आहे. हे पुस्तक वाचताना आपल्याला अनेक गोष्टी समजतात.

त्यांनी आपल्याला सांगितले की पुरुष व स्त्रियांना आध्यात्मिक साधना करण्यासाठी समान संधी व समान अधिकार असतात. त्यांनी स्पष्टपणे सांगितले, 'आपण सारे समान आहोत.'

त्यांनी आपल्याला सांगितले की ध्यान हा पूजेचा सर्वोच्च प्रकार आहे. मी नेहमी त्याला पुस्ती जोडतो, 'आणि कमी खर्चाचा सुद्धा!' पूजा ही आपल्या प्रेमाची व आदराची अभिव्यक्ती असते. अमरांनी आपल्याला पूजा करण्याची उच्च पद्धत शिकवली "ऊर्जा गोळा करणे व त्या ईश्वराला वाहणे. ते म्हणत की पूजेचे महत्त्व आहे, परंतु ऊर्जा अर्पण करणे ही पूजेची सर्वोत्तम पद्धत आहे."

ते म्हणत की साधनेचा सर्वात महत्त्वाचा व सर्वोच्च भाग आहे प्रेम व्यक्त करणे. आपण फार मोठी झेप घेऊ शकतो, आपण आपले संपूर्ण आयुष्यच बदलून टाकू शकतो पण आपल्याला ह्या गोष्टींबाबत काय तो निर्णय घ्यायला पाहिजे. आपल्याला उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऊर्जा, ज्ञान आणि तंत्रांनी आपल्याला अधिक चांगले व अनोखे मानव बनवले पाहिजे. तेव्हा चला, आपण स्वतःला बदलवूया. आपल्यात परिवर्तन घडवणे हे अमरांविषयी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासारखे आहे. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## श्री. जयंत देशपांडे यांच्या व्याख्यानातील वेचे

संकलन शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजींची अनुपस्थिती आपल्या सर्वांना खूप जाणवते आहे. आपल्या प्रत्येकासाठी त्यांच्याशिवाय जीवन ही विचारबाह्य गोष्ट आहे. स्वाभाविकच आपण सगळे दुःखी आहोत. पण असे असूनही, असे काही क्षण असतात जेव्हा आपण स्मित करू शकतो, विनोद करू शकतो किंवा हसू पण शकतो. त्यांनी आपल्याला नक्कीच ऊर्जा पुरवली असणार आणि त्यामुळे कसेतरी करून आपण पुढे वाटचाल करू शकत आहोत. मला असे वाटते की गुरुजी आणि ऋषींच्या सोबत सर्व काही शक्य आहे.

ऋषी या पृथ्वीला विलक्षण ऊर्जांनी व्यापून टाकत आहेत ज्या आपल्याला सकारात्मक होण्यात, प्रगती करण्यात आणि नवयुगाची निवड करण्यासाठी मदत करत आहेत. या ऊर्जांमुळे आपण स्वतःची तयारी करू शकतो. जेव्हा फोटॉन बेल्टच्या ऊर्जा आणि तारामंडळाच्या गाभ्यातून आलेल्या ऊर्जा सक्रिय होतील तेव्हा आपण त्यांना ग्रहण करण्यासाठी तयार असू.

ज्या दिवसाची लोक सर्वात मोठ्या प्रमाणावर वाट पाहत होते, तो २१ डिसेंबरचा दिवस आपण ओलांडला. या दिवसाबद्दल सगळीकडे भीती, उत्कंठा आणि खूप अपेक्षा पण होत्या. प्रसारमाध्यमांच्या काही भागांकडून, काही उपहासकर्त्यांकडून मोठ्या प्रमाणात खिल्ली पण उडवली गेली. स्वाभाविकच प्रत्येकाच्या मनात पुष्कळ प्रश्न उठले आहेत. आज जर गुरुजी आपल्यात असते, तर त्यांनी सगळ्या घटनांवर नियंत्रण ठेवणाऱ्या ऋषींचा दृष्टिकोन आपल्याला सांगितला असता. आपल्याला माहीत नाही की अपेक्षित घटना पुढे ढकलण्यात आल्या आहेत की रद्द करण्यात आल्या आहेत, पण चेतनेत बदल नक्कीच झाला आहे.

लोकांनी असे सांगितले आहे की त्यांना निसर्गात एक विलक्षण शांतता जाणवते आहे. आपल्या आत आणि बाहेर आता जास्त स्तब्धता आहे. काही लोकांनी मला सांगितले की काही प्रसंगी ते सहसा वेगळ्या पद्धतीने वागले असते, विरोध किंवा प्रतिकार केला असता परंतु कसे कोण जाणे ह्या प्रसंगात ते अगदी सभ्यतेने वागले. त्यांनी संघर्ष केला नाही. हा फार मोठा बदल आहे. काही तरी आपल्यात घडले आहे. आपल्याला याचे बारकाईने निरीक्षण करायला हवे. अधर्माप्रती आता पूर्वीपेक्षा जास्त संताप आहे. या संतापाच्या लाटेला यापुढे दुर्लक्षून चालणार नाही किंवा दाबता पण येणार नाही. माझ्या आकलनानुसार या सर्व गोष्टी चेतनेतील स्थित्यंतराची चिन्हे आहेत.

सोमयाजींनी उलगडा केला की गॅलेक्टिक प्लेन हा जाड पट्टा असतो. आपण १९८० पासून त्याच्या सरळ रेषेत आहोत आणि २०१६ पर्यंत राहणार आहोत. त्याच प्रमाणे फोटॉन बेल्ट हा पण ऊर्जेचा एक जाड पट्टा असून सूर्यमालेचा काही भाग फार काळापासून त्यात आहे. पृथ्वी सूर्याभोवती भ्रमण करत असल्यामुळे आपण सुद्धा पृथ्वीसह थोड्या वेळासाठी फोटॉन बेल्टच्या आत जात होतो आणि बाहेर पडत होतो. गुरुजींनी सांगितले होते की मे २०१२ पासून आपली पृथ्वी पूर्णपणे फोटॉन बेल्ट मध्ये आहे. आणि २१ डिसेंबरला आपल्या सूर्यमालेने संपूर्णपणे फोटॉन बेल्ट मध्ये प्रवेश केला आहे. पण या ऊर्जा संपूर्णतः सक्रिय झालेल्या नाहीत. या ऊर्जा २१ डिसेंबर पासून सक्रिय होतील अशी अपेक्षा आपण करत होतो. जर का या ऊर्जा सक्रिय झाल्या तर मग खूप विनाश होईल, कारण फोटॉन बेल्टच्या ऊर्जा अशुद्धता सहन करू शकत नाहीत. जर या ऊर्जा सोडण्यात आल्या तर अर्थातच विनाश होईल. या ऊर्जा केव्हा व किती सोडायच्या ते ऋषींना चांगले कळते.

चेतनेतील स्थित्यंतराची लोकांना मदत होते आहे. ज्यांनी परिवर्तनाची निवड केली आहे, त्यांच्या परिवर्तनास सुरुवात होईल. ज्यांनी निवड केलेली नाही, त्यांना निवड करण्यात ह्याची मदत होईल. प्रलय प्रक्रिया आणखी तीव्र होऊन आपल्याला मदत करणे सुरू ठेवतील. कारण त्यांना व्यवस्था पूर्णपणे शुद्ध करायच्या आहेत. आपण प्रकाशाची सातत्याने निवड करत राहायला हवी आणि प्रकाशाला नेहमीच धरून ठेवायला हवे. ह्या प्रक्रिया २०१६ किंवा २०१८ पर्यंत सुरू राहतील. पण मला असे वाटते की आपल्याला काळजी करण्याची आवश्यकता नाही कारण गुरुजी व ऋषी आपल्या सोबत आहेत. गुरुजी सूक्ष्म पातळीवरून आपल्याला मार्गदर्शन करीत आहेत. आपण एका गौरवशाली काळाकडे वाटचाल करीत आहोत आणि लवकरच आपल्यातील सुप्त क्षमता जागृत होतील, असा माझा विश्वास आहे. एके दिवशी नक्कीच ऋषींशी आपला अधिक स्पष्ट संपर्क साधला जाईल. ■

## महान महर्षी

शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

गुरुजींनी थोर महर्षी अमरांना आपल्या जीवनात आणले. महर्षी अमरांनी त्यांच्यासोबत ज्ञान, ऊर्जा आणि प्रेमाचा महासागर आणला. वयाच्या अवघ्या नवव्या वर्षापासून ते शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी ऋषींसाठी अविरत कार्य केले. महर्षी अमरांची विनम्रता, साधेपणा, ऋषींवर असलेली त्यांची भक्ती आणि ऋषींप्रती समर्पण हे अनुकरणीय आहे.

अमरांनी जीवन आणि जगणे याला खूप महत्त्व दिले. त्यांच्या मते संपत्ती मग ती भौतिक असो किंवा ज्ञान अथवा ऊर्जेच्या स्वरूपात असो, ती इतरांसोबत वाटून घेण्यासाठी आणि पसरवण्यासाठी असते. एखाद्या गरजू व्यक्तीचे मूल्यमापन करण्याची आणि त्याला पारखून घेण्याची लोकांची प्रवृत्ती असते आणि त्यानंतरच ते त्याला मदत करण्याचा निर्णय घेतात. पण, महर्षी अमर म्हणत असत की देणे हा आपला धर्म आहे; प्रेम हा आपला मूळ स्वभाव आहे आणि प्रेम सर्वांना समान मदत करते. ते नेहमीच उदारपणे जीवन जगले. जीवनातील प्रत्येक तपशीलात परिपूर्ण असलेले ते एक महान गुरू होते.

ध्यान आणि ऋषींची ओळख आपल्याला महर्षी अमरांनी करून दिली. सूक्ष्म पातळीवरील ऋषींच्या नेटवर्कशी आपण ध्यानसाधक जोडलेले आहोत ज्यामुळे त्यांच्याकडून निरीक्षणासाठी, मार्गदर्शन आणि संरक्षण मिळवण्यासाठी आपण पात्र ठरतो. निश्चितच हे एक महान वरदान आहे! ध्यानाने आपल्या जीवनाला एक दिशा दिली आहे, आपल्यात बदल घडवून आणले आहेत, आपले जीवन शांतीमय आणि आनंदी बनवले आहे.

आपण ज्या संक्रमण काळातून जात आहोत, त्याबद्दल अमरांनी आपल्याला दुर्मिळ असे ज्ञान दिले. या काळात पृथ्वीवर पसरवण्यात आलेल्या ज्या नवीन ऊर्जांमुळे मानवतेमध्ये बदल घडून शांती, एकोपा आणि प्रेमपूर्ण नवयुगात त्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा होईल त्या ऊर्जांविषयी त्यांनी ज्ञान दिले. त्यांनी जे सर्व आपल्याला आणि मानवतेला दिले आहे, त्याबद्दल आमचे हृदय प्रेमाने आणि कृतज्ञतेने भरले आहे. त्यांचे गहिरे व शाश्वत प्रेम, आपल्याला त्यांनी जे सर्व शिकवले त्याचे अनुसरण करण्यासाठी आणि त्याप्रमाणे जगण्यासाठी, आपले सतत मार्गदर्शन करत राहील. ■

## महर्षी अमर – महान मार्गदर्शक गुरू

जया बी., अनुवाद : सुनिता देशपांडे

जेव्हा कधी भगवान कृष्णाबद्दल आपण बोलतो, तेव्हा त्यांना आपण 'पूर्ण अवतार' म्हणतो. तसेच, महर्षी अमरांना आपण निश्चितच 'पूर्ण पुरुष' असे संबोधू शकतो. एक परिपूर्ण महात्मा आणि आध्यात्मिक मार्गदर्शक अशा अमरांच्या अतुलनीय, अनुकरणीय गुणांबद्दल भरभरून सांगताना गुरुजी कधीच थकत नसत. एक माणूस म्हणून असोत किंवा एखादा प्रबुद्ध महात्मा म्हणून असोत, महर्षी अमर अतुलनीय आहेत. मानवी आणि आध्यात्मिक मूल्यांच्या सर्वोच्च तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करून त्यांनी आपल्यापुढे एक उच्च आदर्श ठेवला.

त्यांचे जीवन म्हणजे देवत्वासोबत गुंफलेला निःशब्द प्रवास होता. त्यांनी कधी भगवे कपडे घातले नाहीत की सत्याच्या शोधात ते हिमालयात गेले नाहीत. इतर कोणत्याही सामान्य माणसाप्रमाणे, त्यांनी जीवनातील सर्व अनुभव घेतले व आपल्या सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्याच बरोबर संगीत ऐकणे, एखादा चित्रपट किंवा टी.व्ही.वर एखादी क्रिकेट मॅच पाहणे अशा साध्या साध्या सुखांचा आनंदही घेतला.

तरीही, असे काय आहे की ज्यामुळे ते आपल्यापेक्षा निराळे ठरतात? त्यांची देवावरील आणि ऋषींवरील अढळ श्रद्धा आणि त्यांच्याप्रती असणारा संपूर्ण समर्पणभाव; संपूर्ण मानवतेसाठी आणि सृष्टीसाठी असलेले निस्वार्थ प्रेम; त्यांना जे मिळाले त्याचा समतोल वृत्तीने संपूर्ण स्वीकार यामुळे ते आपल्याहून निराळे ठरतात. ते विनम्रतेचे साकार रूप होते. त्यांचा स्वतःचा वैयक्तिक असा कोणताच हेतू नव्हता. दैवी इच्छेचे ते एक परिपूर्ण साधन होते. निःशंकच ते परिपूर्ण संन्यासी आणि एक गृहस्थ असे दोन्हीही होते. ते सर्वोच्च प्रतीचे महान गुरू होते. गुरुजींमुळे आपल्याला त्यांच्याबद्दल केवळ माहीतच झाले असे नाही तर त्यांच्या माध्यमातून आपण महर्षी अमरांना पाहिले सुद्धा आहे. कारण महर्षी अमर जे काही होते, ते सर्व गुरुजी जगले. त्यांनी अक्षरशः अमरांना अंतरंगात भरून घेतले होते. त्यांचे श्वास आणि आत्मे एक झाले होते.

आपल्याला गुरुजी आणि महर्षी अमरांकडून जे काही प्राप्त झाले त्याबद्दल आपण आपले मनःपूर्वक प्रेम आणि कृतज्ञता, फक्त त्यांच्या शिकवणुकीप्रमाणे जगून आणि प्रकाश मार्गावर चालून व्यक्त करू शकू. ■

## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 75/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis - Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis - Vol 3 | 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol 4, 5 & 6 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis | 100/- |
| Pyramid Revelations | 75/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु-शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करें (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2012-14
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

ध्यान करताना व त्यानंतर काही तास मी विस्तीर्णता, दयाभाव, खुशी, शांती, प्रेम, तेजस्वी प्रकाश व आनंद अनुभवते. कधी कधी यापैकी पुष्कळ गोष्टी मी एकाच वेळी अनुभवते. पूर्वी मी यापैकी पुष्कळ गोष्टी एकाचवेळी अनुभवत नसे, एखादीच गोष्ट मी एकेवेळी अनुभवत असे.

तीन आठवड्यांपूर्वी शनिवारी रात्री सूक्ष्म पातळीवर भरलेल्या एका वर्गात मी हजेरी लावली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याबाबतचा तपशील मला आठवला. त्या वर्गात कर्मांच्या नियमांबद्दल व गुरुंबद्दल मला सांगण्यात आले होते. नंतर रविवारच्या ध्यानवर्गात गुरुजी ह्याच मुद्द्यांवर बोलले!

– नंदिता विजयन

एका पौर्णिमेच्या रात्री ध्यानानंतर विश्रांतीकरिता मी डोके टेकवले आणि तितक्यात दुसऱ्या एका हाताने माझ्या हाताला ओझरता स्पर्श केला. काहीतरी अद्भुत माझ्यामध्ये संक्रमित झाले, ज्याने मला चैतन्याच्या महासागरात नेले. एक दैवी द्रव्य, एक अतिशय शक्तिशाली ऊर्जाक्षेत्र या स्वरूपात मी त्या महासागराचा अनुभव घेतला. ह्या अतिशय वेगळ्या व अद्भुत जगाची मी साक्षी होते. असे पुष्कळदा होते आहे पण पौर्णिमेला रात्री उशीरा असे हमखास घडते. हा स्पर्श माझ्या ओळखीचा आहे व पुन्हा पुन्हा तोच स्पर्श मी अनुभवत आहे. नंतर गुरुजींनी मला सांगितले की तो कोमल स्पर्श एका ऋषींचा होता!

– विद्या विश्वामित्र

२ ऑक्टोबर रोजी ध्यान करताना माझे शरीर स्थिर झाले व माझ्या मनाचे भटकणे थांबले. माझ्या मनात एकाही विचाराने प्रवेश केला नाही. मी माझ्या अवतीभवती तेजस्वी प्रकाश पाहिला. माझ्या हृदयाला प्रसन्न करणारी शांतता व शांती मी अनुभवत होतो. असा अनुभव मला पहिल्यांदाच आला आणि पुन्हा जास्त प्रमाणात असे अनुभवण्याची माझी इच्छा आहे.

– हरिलाल दुधिया

कधीकधी स्वप्नात रंगीत काचांसारख्या विविध रंगांच्या प्रकाशाने नटलेला प्रकाश गोल मला दिसतो. एका स्वप्नात मी गुरुजींच्या मागून चालत होते. आणि मला ७७ हा क्रमांक देण्यात आला व "मी सर्व पातळ्यांवर मुक्त आहे" असे जाहीर करण्यात आले. आता भय कमी झाले आहे आणि विस्तीर्णतेची व खोलवर बरे होत असल्याची जाणीव होत आहे. मी जास्तीत जास्त 'इथे व या क्षणात' जगत आहे.

– मार्शिआ स्टो

दि. २५ ऑक्टोबर रोजी कॉस्मिक टॉवरमध्ये ध्यान करताना अचानकपणे चमकणारा तेजस्वी पांढरा प्रकाश माझ्या दृष्टीस पडला. नंतर कॉस्मिक टॉवरच्या छताकडून ऊर्जेचा एक झोत माझ्या डोक्याद्वारे माझ्यात शिरला. त्या ऊर्जांनी माझे सर्वांग व्यापल्यावर मी प्रकाशरूप झालो. माझ्या शरीराचा स्थूल भाग नाहीसा झाला. मी वजनरहित झालो व तरंगू लागलो. मी कशापासूनही बनलो नव्हतो आणि मी दैवी परमानंद अनुभवला.

– किरण नाईक

काही दिवसांपूर्वी, माझ्या हातून गहाळ झालेल्या काही महत्त्वाच्या कागदपत्रांचा मी शोध घेत होतो. तेव्हा एकाएकी प्रकाशाचा उपयोग करून घेण्याबाबतचे गुरुजींचे शब्द मला आठवले. एका मिनिटासाठी मी प्रकाशाच्या महासागराचा अनुभव घेतला. मला असे वाटले की जणू काही गुरुजींनी मला विचारले, 'तू तुझी सर्व कागदपत्रे कोठे ठेवतोस?' माझ्या आतून उत्तर आले, 'माझ्या लॅपटॉपच्या बॅगेत'. मी ताबडतोब उठलो व पाहिले. माझी कागदपत्रे मला तेथे सापडली. आता मला उमजले आहे की यापूर्वी कधी मी परमेश्वराशी संवाद साधण्याचा प्रयत्नच केला नव्हता. ह्या महान व सोप्या तंत्राबद्दल मी गुरुजी व ऋषींचा आभारी आहे.

– आशुतोष भट

ध्यान करीत असताना जवळ जवळ नेहमीच प्रेम व प्रकाश माझ्यासोबत असल्याचा अनुभव मला येतो. मी प्रकाशात आहे असे मी अनुभवते आणि काही क्षण मला माझ्या शरीराचे अस्तित्वच जाणवत नाही, जाणवतो तो फक्त प्रकाश. पण त्याचवेळी मला माझ्या अस्तित्वाची कल्पना असते. ही फारच सुंदर अनुभूती आहे. असे वाटते की ही अनुभूती आणखी काही वेळ टिकायला हवी होती.

– रमा देवी

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore - 86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande